# ॲग्रोमेट ॲडवायझरी बुलेटीन
## ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु, कोल्हापूर
## विभागीय कृषि संशोधन केंद्र, शेंडा पार्क, कोल्हापूर

दूरध्वनी : (०२३१) २६९२४१६ ईमेल: adrkolhapur@rediffmail.com

**हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. २२.०९.२०२६**

**जिल्हा : सातारा**

| मागील आठवड्यातील हवामान (१६.०९.२०२६ ते २२.०९.२०२६) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (२३.०९.२०२६ ते २७.०९.२०२६) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | दिनांक | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| - | - | - | - | - | - | - | पाऊस (मिमी) | १८ | १० | ६ | ५ | ४ |
| - | - | - | - | - | - | - | कमाल तापमान (अं.से.) | ३३ | ३२ | ३१ | ३२ | ३२ |
| - | - | - | - | - | - | - | किमान तापमान (अं.से.) | २१ | २१ | २२ | २२ | २३ |
| - | - | - | - | - | - | - | ढग स्थिती (आकाश) | ५ | ५ | ४ | ३ | ३ |
| - | - | - | - | - | - | - | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ८५ | ८४ | ८४ | ८४ | ८६ |
| - | - | - | - | - | - | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ७५ | ७५ | ७० | ७१ | ६८ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | १० | ११ | १६ | १५ |
| - | - | - | - | - | - | - | वाऱ्याची दिशा | प.वा. | प.वा. | प.वा. | प. | प. |

## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये २३, २४, २५, २६ व २७ सप्टेंबर रोजी आकाश सामान्यत: ढगाळ राहण्याची शक्यता आहे. **सातारा जिल्ह्यातील घाट भागात २३ व २४ सप्टेंबर रोजी बऱ्याच ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची तसेच २५, २६ व २७ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी हलक्या स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे. मध्य व पूर्व भागात २३ व २४ सप्टेंबर रोजी काही ठिकाणी हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची तसेच २५, २६ व २७ सप्टेंबर रोजी तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. सातारा जिल्ह्यामध्ये २७ सप्टेंबर पर्यंत कमाल तापमान ३१.० ते ३३.० अंश सेल्सिअस दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान २१.० ते २३.० अंश सेल्सिअस या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.** सकाळची सापेक्ष आद्रता ८४ ते ८५% या दरम्यान, दुपारची सापेक्ष आद्रता ६८ ते ७५% या दरम्यान राहण्याची तसेच वाऱ्याचा वेग ताशी ०८ ते १५ किमी या दरम्यान राहण्याची शक्यता आहे.<br>मागील आठवड्यामध्ये दिलेल्या हवामान अंदाजानुसार सातारा जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी खूप हलका ते हलक्या स्वरूपाचा पाऊस झाला. |
| हवामान इशारा | | २२.०९.२६ — **सातारा जिल्ह्यामध्ये व जिल्ह्यातील घाट भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ४० ते ५० किमी वेगाच्या वाऱ्यासह मुसळधार स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.**<br>२३.०९.२६ — **सातारा जिल्ह्यामध्ये व जिल्ह्यातील घाट भागात तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ४० ते ५० किमी वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.**<br>२४.०९.२६ — **सातारा जिल्ह्यामध्ये तुरळक ठिकाणी मेघगर्जना, विजांचा कडकडाट व ताशी ३० ते ४० किमी वेगाच्या वाऱ्यासह हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.** |
| विस्तारित श्रेणी अंदाज | | विस्तारित श्रेणीच्या अंदाजानुसार मध्य महाराष्ट्रामध्ये दिनांक २७ सप्टेंबर ते ३ ऑक्टोबर दरम्यान पावसाचे प्रमाण सरासरी पेक्षा कमी राहण्याची, कमाल तापमान सरासरी दरम्यान राहण्याची तसेच किमान तापमान सरासरी दरम्यान राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | ➢ **कीटकनाशके व बुरशीनाशकांची फवारणी पावसाची उघडीप पाहून आणि वारा शांत असताना करावी.**<br>➢ **शेतकरी बांधवांनी हवामान आधारित शेतीविषयक सल्ला आपल्या अँड्रॉइड मोबईलवर मिळविण्यासाठी गुगल प्ले स्टोअर वरून "** मेघदूत" अँड्रॉइड ॲप्लिकेशन तर मेघगर्जना व विजांचा कडकडाट इ.च्या अंदाजासाठी "दामिनी" अँड्रॉइड ॲप्लिकेशन डाउनलोड करावे व त्याचा वापर करावा.<br>➢ मेघदूत ॲप्लिकेशन लिंक: https://play.google.com/store/apps/details?id=com.aas.meghdoot<br>➢ दामिनी ॲप्लिकेशन लिंक : https://play.google.com/store/apps/details?id=com.lightening.live.damini |
| संदेश | | ❖ **पक्व झालेल्या मूग, उडीद, राजमा व इतर खरीप पिकांची काढणी करावी व काढणी केलेला शेतीमाल त्वरित सुरक्षित ठिकाणी ठेवावा** |
| भात | फुलोरा | ➢ भात पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार शेतातील पाण्याची पातळी नियंत्रित ठेवावी. भात पीक अधिकतम फुलोरा अवस्थेत असताना शेतात ५ ते १० सें.मी. पाण्याची पातळी राखावी. **पाण्याची कमतरता असल्यास जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्याचा** प्रयत्न करावा.<br>➢ **भात पिकावर लष्करी अळीचा** प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी क्लोरपायरीफॉस २० मिली + सायपरमेथ्रीन ५ मिली प्रति पंप **या प्रमाणात फवारणी करावी.**<br>➢ भातावरील आभासमय काणी (फॉल्स स्मट) रोगाच्या प्रतिबंधासाठी फुलोरा सुरू होताना (५ **टक्के फुलोरा अवस्था**) प्रोपिकोनॅझोल |

मिली प्रति लि या प्रमाणात फवारणी करावी त्यानंतर पाच दिवसांनी टक्के फुलोरा अवस्थेत असताना दुसरी

| | | |
|---|---|---|
| | | फवारणी करावी. |
| ऊस | शाकिय वाढ | ➢ ऊस पिकामध्ये पाण्याचा ताण पडत असल्यास २ टक्के युरिया किंवा २ टक्के म्युरेट ऑफ पोटॅशची फवारणी करावी.<br>➢ जमिनीतील ओलावा टिकवून ठेवण्यासाठी उसाची खालची पक्व व वाळलेली पाने काढून ती सरीमध्ये आच्छादनासाठी वापरावीत.<br>➢ पाण्याची बचत करण्यासाठी ऊस पिकाला एक आड एक सरी पद्धतीने सिंचन करावे.<br>➢ सिंचनासाठी पुरेशा पाण्याची खात्री झाल्याशिवाय पूर्वहंगामी ऊस लागवडीची पूर्वतयारी सुरू करू नये. |
| सोयाबीन | शेंगा भरणे | ➢ कमाल तापमानामध्ये झालेली वाढ व वाढलेल्या आद्रतेमुळे काही ठिकाणी शेंगेवरील करपा या रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. प्रादुर्भाव दिसून येताच नियंत्रणासाठी टेब्युकोनॅझोल १०% + सल्फर६५% डब्ल्यु. जी. या बुरशीनाशकाची २५ ग्रॅम प्रती १० लीटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी<br>➢ शेंगा भरण्याच्या अवस्थेत ००.००.५० या विद्राव्य खताची १० ग्रॅम प्रती लीटर पाणी याप्रमाणात फवारणी करावी. |
| मूग | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या शेंगांची वेळेत काढणी करावी. काढणी उशिरा केल्यास पक्व झालेल्या शेंगा तडकतात.<br>➢ काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| उडीद | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या शेंगांची वेळेत काढणी करावी. काढणी उशिरा केल्यास पक्व झालेल्या शेंगा तडकतात.<br>➢ काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| घेवडा | शेंगा भरणे ते पक्वता | ➢ पावसाची शक्यता असल्याने पक्व झालेल्या शेंगांची वेळेत काढणी करावी. काढणी उशिरा केल्यास पक्व झालेल्या शेंगा तडकतात.<br>➢ काढणी केलेल्या शेती मालाची सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी. |
| टोमॅटो | फळधारणा | ➢ मध्यम पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे टोमॅटो झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून टोमॅटो झाडांनारोपांना काठीच्या किंवा बांबूच्या / सहाय्याने आधार द्यावा<br>➢ काढणी केलेल्या टोमॅटो फळांची त्वरित सुरक्षित ठिकाणी साठवणूक करावी |
| केळी | घड तयार होणे | ➢ मध्यम पाऊस आणि जोरदार वाऱ्यामुळे केळी झाडे उन्मळून पडू नयेत म्हणून केळीच्या झाडांना रोपांना काठीच्या किंवा/बांबूच्या सहाय्याने आधार द्यावा |
| डाळिंब | मृग बहार | ➢ **फुलधारणा आणि फळधारणा अवस्थाः**<br>➢ शोष किडींसाठी झाडाच्या शेंड्याच्या १५ सेमी खाली नागमोडी (झिक-झ्याक) पद्धतीने पिवळे / निळे चिकट २५ ते ३० सापळे प्रती एकर प्रमाणे बांधावेत तसेच खाली नमूद केलेल्या फवारण्या घ्याव्यात.<br>➢ पहिली फवारणी: स्पीनेटोरम १२% एस. सी. १.०. मिली प्रती लिटर किंवा स्पीनोसेंड ४५% एस. सी. (०.५ मिली प्रती लिटर + ०.२५ मिली प्रती लिटर स्प्रेडर/स्टिकर मिसळून फवारणी करावी. |
| हळद | कंद वाढीची | ➢ मागील आठवड्यातील ढगाळ व दमट हवामानामुळे काही ठिकाणी पानांवरील करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. रोगाच्या नियंत्रणासाठी ॲझॉक्सिस्ट्रोबिन १८.२% + डायफेनोकोनॅझोल ११.४% एससी @ १० मिली प्रति १० लिटर पाणी या प्रमाणात फवारणी करावी. |
| पशुधन | वाढीची | ➢ जंत निर्मुलन झालेले असल्यास लाळ खुरकत या रोगाच्या प्रतिबंधासाठी तज्ञ पशु वैद्यकांच्या सल्ल्याने लसीकरण करून घ्यावे.<br>➢ मेघगर्जना व विजांच्या कडकडाटासह हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता असल्याने इशारा कालावधीदरम्यान जनावरे शक्यतो बाहेर चारावयास नेऊ नयेत.<br>➢ जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असल्यास जनावरांसाठी चाऱ्याचे नियोजन करण्याकरिता चाऱ्यासाठी रब्बी ज्वारीची पेरणी करावी.<br>➢ पाण्याची उपलब्धता असल्यास संकरीत नेपीयर गवतची लागवड करावी.<br>➢ चाऱ्यासाठीचा मका उपलब्ध असल्यास मुरघास तयार करावा |

| | |
|---|---|
| मेघदूत ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे | दामिनी ॲप्लिकेशन डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करावे |

स्त्रोत १) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

ठिकाण: कोल्हापूर

दि. : २२.०९.२०२६

स्वाक्षरीत

प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, कोल्हापूर तथा

सहयोगी संशोधन संचालक,

विभागीय कृषि संशोधन केंद्र , कोल्हापूर